# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/10/2023 (मंगळवार) सकाळ


## पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त
## पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निरोप समारंभ
## तसेच ०९ पोलीस अंमलदारांना पदोन्नती बहाल

दिनांक ३१/१०/२०२३ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण) येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **"निरोप समारंभाच्या"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. सुधाकर शालीकराम लोहकरे, पोलिस मुख्यालय, नागपूर ग्रामीण २) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. राजू हंसदास गजभिये, नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीण ३) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. ईस्माईल मुजफ्फर शेख, पोलीस स्टेशन सावनेर ४) सहायक फौजदार श्री. दिनेश रामदुलारेसिंग ठाकुर, पोलीस स्टेशन सावनेर ५) पोलीस हवालदार श्री. उमेश यादवराव ठाकरे, पोलीस स्टेशन खापरखेडा ६) चालक पोलीस हवालदार श्री. बाबाराव लक्ष्मणराव बोबडे, महामार्ग पोलीस नागपूर विभाग नागपूर यांना पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, नागपूर ग्रामीण यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी अंमलदारांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस अधीक्षक यांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची प्रशंसा केली.

तसेच पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर आस्थापनेवरील ०९ अंमलदार यांना पदोन्नती मिळाली आहे. यामध्ये ०६ पोलीस नायक यांना पोलीस हवालदार पदावर, ०३ पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. याबाबतचे आदेश दि. ३१ आक्टोंबर २०२३ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. यामध्ये महिला पोलीस नायक हेमलता झाडे, पोलीस प्रशिक्षण केंद्र नागपूर, चालक नापोशि प्रमोद मडावी जिल्हा वाहतूक शाखा, नाग्रा. मपोना वंदना सारवे, पोस्टे बेला, मपोना नजमा शाह, महिला तक्रार निवारण सेल, पोना राधेश्याम कांबळे, पोस्टे उमरेड, मपोना वसिमा अली, राज्य गुप्तचर विभाग यांना पोलीस नाईक पदावरून पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात आली. तसेच पोहवा प्रकाश गेडाम, मोटर परिवहन विभाग, पोहवा गंगाप्रसाद वरखडे, पोस्टे पारशिवनी, पोहवा प्रकाश उईके, पोलीस मुख्यालय नाग्रा. यांना पोलीस हवालदार पदावरून सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) यांनी पदोन्नती मिळालेल्या सर्व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.

या कार्यक्रमाला उप पोलीस अधीक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर व कार्यालयातील मानव संसाधन शाखा ना.ग्रा पोलीस निरीक्षक श्री. संतोषसिंग ठाकुर, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. शैलेश शुक्ला, महिला पोलीस हवालदार रोशनी वाघधरे, महिला अंमलदार मिरा केंद्रे इतर अधिकारी व अंमलदार (स्टाफ) उपस्थित होते.











पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर